admn 19-20


**महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद,**

(महाराष्ट्र कृषी विद्यापीठ अधिनियम, १९८३ मधील कलम १२ नुसार स्थापित)

१३२/ब, भांबुर्डा, भोसलेनगर, पुणे - ४११ ००७.

MCAER कृषि परिषद

ई-मेल : edn_mcaer@rediffmail.com संकेतस्थळ : www.mcaer.org दूरध्वनी (०२०) २५५२८६८८


जा.क्र. मकृप/शिक्षण-१/१११९/ १६८७६ दि. १५ जुलै,२०१९

## परिपत्रक

**विषय:- डॉ. वासाकोकृवि, दापोली अंतर्गत अन्नतंत्रज्ञान महाविद्यालय, आचळोली व जैवतंत्रज्ञान महाविद्यालय, आचळोली या महाविद्यालयांचे विकल्प उपलब्ध असण्यावावत.**

डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली अंतर्गत कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालय, आचळोली, ता.महाड जि.रायगड आणि अन्नतंत्रज्ञान महाविद्यालय, आचळोली, ता.महाड जि.रायगड या दोन महाविद्यालयांचा सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षाच्या प्रवेश प्रक्रियेत समावेश करण्याविषयी डॉ. वासाकोकृवि, दापोली यांच्याकडून प्रस्ताव प्राप्त झाला होता. यासंदर्भात राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षाकडून या कार्यालयास सूचना प्राप्त झालेल्या आहेत.

यास्तव सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षांतर्गत अन्नतंत्रज्ञान व जैवतंत्रज्ञान विद्याशाखांना पात्र असलेल्या तसेच विहित पध्दतीने ऑनलाईन प्रवेश अर्ज दाखल केलेल्या सर्व उमेदवारांना या परिपत्रकाद्वारे अवगत करण्यात येते की, **अन्नतंत्रज्ञान महाविद्यालय, आचळोली, ता.महाड जि.रायगड (सांकेतांक क्रमांक १६२८०) व कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालय, आचळोली, ता.महाड जि.रायगड (सांकेतांक क्रमांक १९२७४)** या महाविद्यालयांचा प्रवेश प्रक्रियेत समावेश करण्यात आलेला असून दि. १६ ते २० जुलै,२०१९ या कालावधीमध्ये या महाविद्यालयांचे विकल्प देण्याची सुविधा उमेदवारांच्या लॉग-इन मध्ये उपलब्ध करण्यात येत आहे.

करिता जे उमेदवार वरील महाविद्यालयांमध्ये प्रवेश घेऊ इच्छितात, त्यांनी दि. १६ ते २० जुलै,२०१९ या कालावधीत लॉग-इनद्वारे या महाविद्यालयांचे विकल्प द्यावेत. उमेदवाराने यापूर्वी दिलेल्या विकल्पामध्ये कोणताही बदल होणार नसून पूर्वीच्या विकल्पानंतर वरील महाविद्यालयांचे विकल्प विचारात घेण्यात येतील, याची संबंधित उमेदवाराने नोंद घ्यावी.

कौसडी.

(हरिहर कौसडीकर)
संचालक (शिक्षण)

प्रत:-

१. मे. टेकनिक आयटी सोल्यूशन, लाईफ स्क्वेअर सोसायटी, ए ३०१, लोहगाव, पुणे ४७ यांना सूचित करण्यात येते की, सदर परिपत्रक कृषी परिषदेच्या संकेतस्थळावर अपलोड करावे.
२. मे. कल्प टेक्नॉलॉजीज प्रा.लि., तिसरा मजला, गोपाळ हाऊस, हॉटेल किमयाजवळ, कर्वे रोड, कोथरुड, पुणे ४११०२९. यांना पुढील कार्यवाहीस्तव.
३. मा. आयुक्त, राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, ८ वा मजला, न्यु एक्सेसर बिल्डींग, ए. के. नायक मार्ग, फोर्ट, मुंबई ४००००१ यांना माहितीसाठी सविनय सादर..
४. कुलसचिव, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली जि. रत्नागिरी यांना माहितीसाठी...

Scanned by CamScanner